अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# निर्णय शंभर टक्के अंमलबजावणी मात्र शून्य

निवडणुका आल्या आणि राज्य सरकारने निर्णय घेण्याचा सपाटा चालू ठेवला. गेल्याच आठवड्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तडकाफडकी तब्बल तेरा निर्णय घेऊन महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने एका अर्थी विक्रमच केला. निवडणुकीच्या तोंडावर आपापसात कुरबुरी नको म्हणून राष्ट्रवादी आणि राष्ट्रीय काँग्रेस यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या एकमेकांच्या संमतीने कशा होतील याचीही व्यवस्था लावून घेतली. त्या तेरा निर्णयांमध्ये अनेक महत्त्वाच्या मुद्यांचा समावेश आहे. प्रश्न असा निमाण होतो की, जी कार्यक्षमता निवडणुकीच्या आधी दाखवली जाते. ती दर आठवड्याला होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकांच्या काळात का दाखवली जात नाही? निवडणुकांच्या तोंडावरच राज्यकर्त्यांना हा जोर का येतो. याचा अर्थ एकूणच राज्यकारभार पाहताना नेहमीच राजकीय दृष्टीकोन ठेवला जातो. प्राधान्यक्रमाने निर्णय झाले पाहिजेत. राज्याच्या सर्व भागांचा विकास समान पध्दतीने झाला पाहिजे. सामान्य माणसाला भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांचा निकाल तितक्याच वेगाने लावला पाहिजे, असे राज्यकर्त्यांना वाटत नाही. आपल्या सोयीप्रमाणे आणि विशेषत: मतांच्या गठ्ठ्यांवर डोळे ठेवून निवडणुकांचा हंगाम लक्षात घेऊन निर्णय घेतले जाण्याची ही पध्दत लोकशाहीच्या दृष्टीने घातकच म्हणायला हवी. हा प्रकार केवळ महाराष्ट्रातच घडला असे नाही. तर दोन महिन्यांपूर्वी मध्यप्रदेशमध्ये विधानसभा निवडणुका घोषित होण्यापूर्वी तिथल्या भाजपा सरकारनेही असेच डझनभर निर्णय घेतले आणि अनेक प्रकल्पांच्या कोनशिला बसवून उद्घाटन समारंभ उरकवून घेतले होते. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने घेतलेले हे तेरा निर्णय राज्याच्या किती हिताचे आहेत किंवा खेड्यापाड्यातल्या सामान्य माणसाला कितपत दिलासा देणारे आहे याचा जर शोध घेतला तर निराशाच पदरी पडेल. राज्याच्या हितापेक्षाही हे सगळे निर्णय राजकारण्यांच्या हिताचे आहेत किंवा राज्यकर्त्यांच्या फायद्याचे आहेत यात काही शंका नाही. म्हणूनच त्याची दखल घेतली पाहिजे आणि ही राजकीय मंडळी निवडणुकांच्या तोंडावर जनतेच्या डोळ्यात कशी धूळफेक करीत असतात हे लक्षात आणून दिले पाहिजे. असे निर्णय घेतल्यामुळे सरकारची कार्यक्षमता सिध्द होत नाही किंवा कोणत्याही विकासाला गतीही मिळत नाही. हा सगळा प्रकार घडत असताना विरोधी पक्षांनीसुध्दा त्याबाबत आक्षेप घेतला नाही किंवा त्याचा जाबही विचारला नाही. यावरून सगळे राजकीय पक्ष कसे एका माळेचे मणी आहेत हे सिध्द होते.

### मूलभूत गरजाही वाऱ्यावर

खरे तर आज राज्यापुढे अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्णयाशिवाय पडून आहेत. त्याचा कोणीही आग्रह करताना दिसत नाही. प्रामुख्याने सामान्य जनतेच्या ज्या मूलभूत गरजा आहेत. त्याबाबत सरकारसुध्दा दुर्लक्ष करताना दिसते. फार मोठा गाजावाजा करून सर्व शिक्षा अभियानाचा नारळ फोडला गेला. जीवनदायी आरोग्य योजनांचे ढोल बडवले गेले. पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरश: हजारो कोटी रुपये मंजूर केले गेले आणि सामान्यांना परवडतील असे गृहबांधणी धोरण अंमलात आणण्याच्या वल्गनाही झाल्या. यातल्या कोणत्याही गोष्टीची आज शंभर टक्के यशस्वी अंमलबजावणी झालेली नाही. आज राज्यातील चाळीस टक्के मुलं निरक्षर किंवा अर्धवट शिक्षणापासूनच वंचित राहतात. गरिबीमुळे आपल्या मनासारखे शिक्षण ही मंडळी घेऊ शकत नाहीत. मोठ्या शिक्षण संस्थांमध्ये अगदी हुशार गरीब विद्यार्थ्याला पाय ठेवायलाही जागा मिळत नाही. गुणवत्ता असूनही चांगल्या शिक्षणापासून दूर राहायची पाळी त्याच्यावर येते. एवढेच नव्हे तर विनाअनुदानित शाळांच्या फी परवडत नाहीत आणि सरकारी शाळांमध्ये शिक्षक जागेवर नाहीत. अशा अत्यंत विचित्र परिस्थितीत सामान्य माणसाला शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टीसाठी संघर्ष करावा लागतो. हीच परिस्थिती आरोग्यासारख्या मूलभूत सुविधेबाबत आहे. सरकारमान्य दवाखान्यांची आज काय परिस्थिती आहे हे नवे सांगण्याची गरज उरत नाही. अत्यंत अस्वच्छ वातावरणात रुग्णांना सरकारी रुग्णालयांमध्ये उपचार घ्यावे लागतात. अगदी मुंबईसारख्या आधुनिक महानगरीतल्या कोणत्याही सरकारी रुग्णालयातल्या जनरल वॉर्डची परिस्थितीही भयानक आहे हे तिथे गेल्याशिवाय लक्षात येत नाही. अक्षरश: खाली फरशीवर आपल्या हातामध्ये आपल्यालाच लावलेल्या सलायनची बाटली धरून रुग्णाला तासन्‌तास बसावे लागते. तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांकडे फिरकत नाहीत. त्यात जर रुग्ण निरक्षर अशिक्षित असेल तर त्याला इतकी गुलामासारखी वागणूक मिळते की, इतक्या अपमानापेक्षा मरण परवडले असे त्याला वाटायला लागते. आरोग्य व्यवस्थेचे असे तीन तेरा वाजत असताना पाण्यासारख्या अत्यंत मूलभूत गरजेचाही सरकारने खेळखंडोबा केला आहे, हे खेड्यापाड्यातल्या पाणीपुरवठ्यावरून लक्षात येते. आजही महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा पाण्यासाठी व्याकूळ आणि तहानलेला आहे. सरकारचे त्याकडे मात्र लक्ष नाही.

### विरोधी पक्षही थंडच

आपल्या सगळ्याच राजकीय व्यवस्थेत 'सगळा गाव मामाचा पण एक नाही कामाचा' अशा पध्दतीचे चित्र पहायला मिळते. राज्यकर्त्यांना भरमसाठ अधिकार आहेत पण ते त्याचा वापर घोषणा आणि वल्गनांसाठीच करतात. त्यामुळे निर्णयांचा नुसता धुरळा उडतो. सामान्य जनतेच्या हाताशी मात्र काहीच लागत नाही. आज राज्यातली एकतरी अशी गोष्ट सांगा की जिच्याविषयी अभिमान वाटावा. असे कुठेच दिसत नाही. सगळीकडेच अर्धवटपणा आणि सावळा गोंधळ पहायला मिळतो. या सगळ्या बजबजपुरीचे कोणालाच काही सोयरसुतक वाटत नाही. सामाजिक संघटना थोडाफार लढा देतात म्हणून काही गोष्टी मार्गी तरी लागतात. अन्यथा केवळ राज्यकर्ते किंवा राजकीय पक्ष त्यांच्या भरवशावर राहून अजिबात भागणार नाही. विरोधी पक्षसुध्दा राज्यकर्त्यांइतकाच राजकीय स्वार्थाने बरबटलेला असतो. एवढे तेरा निर्णय झाले पण विरोधी पक्षांच्या कानाला त्याचा वाराही लागलेला दिसत नाही. तेरा निर्णयांचा खरे तर विरोधी पक्षांनी पंचनामा करायला हवा आणि लोकांची तशी दिशाभूल झालेली आहे हे मांडायला हवे. दुर्दैवाने सगळेच राजकीय पक्ष एकाच पध्दतीने विचार करीत असल्यामुळे त्यांच्या यादीमध्ये सामान्य जनतेला नेहमीच शेवटचे स्थान राहते. नुसते निर्णय घेऊन राज्य चालत नसतात. निर्णयांना शंभर टक्के अंमलबजावणीची गरज असते.